महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्रमांक-उशिसं/विधी/प्र.क्र.१५९-१८/सीईटीसेल/ ९१४५४ दिनांक : 30 NOV 2018

**परिपत्रक :**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याबाबत . . .**

संदर्भ : १. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे पत्र क्र. संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/१२२, दिनांक ०५.०९.२०१८

२. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे पत्र क्र. संकीर्ण/प्रनिप्रा/प्र.प्र.प.का./१६६२/२०१८ दिनांक २६.११.२०१८

३. प्रवेश नियामक प्राधिकरणाची दिनांक २९.११.२०१८ रोजीची बैठक

४. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे पत्र संकीर्ण/प्रनिप्रा/प्र.प्र.प.का./२८५/२०१८, दिनांक २६.११.२०१८.

संचालनालयाच्या अखत्यारीतील विधी ३ वर्ष, विधी ५ वर्ष, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए./बी.एस्सी.बी.एड. आणि बी.एड-एम.एड. या अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया संपुष्टात आलेली आहे. यापूर्वी प्रवेश प्रक्रिया संपुष्टात आल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश पडताळणी प्रक्रिया संचालनालय स्तरावर ऑफलाईन पध्दतीने करण्यात येत होती. संचालनालयामार्फत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या पडताळणी झाल्यानंतर सदरहू याद्या महाविद्यालयांमार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करण्यात येत होत्या.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून शासकीय, अशासकीय अनुदानित, अशासकीय अनुदानित अल्पसंख्यांक, विद्यापीठ संचलित विभाग/महाविद्यालये, विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित, विना अनुदानित / कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक महाविद्यालयांमध्ये उक्त नमूद व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश हे संगणीकृत प्रणालीद्वारे पडताळण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे http://www.safalta.org हे पोर्टल तयार केलेले आहे. सदरहू पोर्टलवर दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत महाविद्यालयांनी नाव नोंदणी करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ०५.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सुचित करण्यात आले होते. तद्नंतर दिनांक १०.१०.२०१८ ते १४.१०.२०१८ या कालावधीदरम्यान नाव नोंदणी करण्यासाठी विशेष बाब म्हणून संधी उपलब्ध करुन

देण्यात आली होती. यानंतर देखील दिनांक १४/१०/२०१८ ते ०१/११/२०१८ पर्यंत नावनोंदणी करण्याची संधी उपलब्ध होती.

तद्नंतर दिनांक १५.११.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये विलंबशुल्कासह १६.११.२०१८ ते १९.११.२०१८ या कालावधी दरम्यान नावनोंदणी करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली होती. यानंतर सीईटी कक्षाकडे / संचालनालयाकडे विविध विनंती पत्रे / इमेल विचारात घेऊन त्यानुषंगाने दिनांक २९.११.२०१८ रोजीच्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार शासकीय, अशासकीय अनुदानित, अशासकीय अनुदानित अल्पसंख्यांक, विद्यापीठ संचलित विभाग, विद्यापीठ संचलित महाविद्यालयांचे प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील हे प्रथम वर्ष विचारात घेऊन या महाविद्यालयांना विना विलंबशुल्क दिनांक ०१.१२.२०१८ ते दिनांक ०५.१२.२०१८ या कालावधी दरम्यान नोंदणीची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

तसेच खाजगी विना अनुदानित/ कायम विनाअनुदानित संस्था, विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक, कायम विनाअनुदानित विद्यापीठ संचलित विभाग/ महाविद्यालयांना प्रति विद्यार्थी रु. २,०००/- व कमाल रु. ५०,०००/- इतके विलंब शुल्क भरुन दिनांक ०१.१२.२०१८ ते ०५.१२.२०१८ या कालावधी दरम्यान नोंदणीची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

सर्व महाविद्यालयांनी दिनांक ०१.१२.२०१८ ते ०५.१२.२०१८ या कालावधी दरम्यान http://www.safalta.org या पोर्टलवर नावनोंदणी करण्यात यावी. यानंतरही जर नोंदणी करण्यामध्ये कोणताही कसूर केल्यास अशा महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यता देण्यात येणार नाही व अशा महाविद्यालयांची माहिती शासनास सादर करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी. नोंदणी करताना येणाऱ्या अडचणीतुन मार्ग काढण्यासाठी सहाय्य कक्ष सुरु करण्यात आलेले आहे. सहाय्य कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०२०-६७६३५९९९ असा आहे.

( डॉ. मोहन खताळ )
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति,

१. प्राचार्य, केद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, अल्पसंख्यांक महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

२/- सदरचे परिपत्रक आपल्या अखत्यारीतील विधी ३ वर्ष, विधी ५ वर्ष, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए./बी.एस्सी.बी.एड. आणि बी.एड-एम.एड. अभ्यासक्रमाचे महाविद्यालयांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, तथा, सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.